सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुलमधील इयत्ता ६ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांना CBSE / NCERT च्या क्रमिक पुस्तकांव्यतिरिक्त, व्यवसाय वर्कबुक, संदर्भ पुस्तके, JEE / NEET, गाईडस व इतर आवश्यक पुस्तके पुरविणेकामी **ई-निविदा**

ई-निविदा क्रमांक :-

१. सदस्य सचिव, महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटी नाशिक तथा आयुक्त आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य नाशिक यांचेकडून नावाजलेल्या व पुस्तकांच्या मुळ प्रकाशकांकडून सन २०२६-२७ या वर्षाकरिता एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुलमधील इयत्ता ६ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांना CBSE/ NCERT च्या क्रमिक पुस्तकांव्यतिरिक्त, व्यवसाय वर्कबुक, संदर्भ पुस्तके, JEE / NEET, गाईडस व इतर आवश्यक पुस्तके पुरविण्याकरिता ई-निविदा मागविण्यात येत आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**निविदा माहिती.**

| | |
|---|---|
| निविदा क्रमांक | |
| निविदा सुचना | सन २०२६-२७ या वर्षाकरिता एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुलमधील इयत्ता ६ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांना CBSE/ NCERT च्या क्रमिक पुस्तकांव्यतिरिक्त, व्यवसाय वर्कबुक, संदर्भ पुस्तके, JEE / NEET, गाईडस व इतर आवश्यक पुस्तके पुरविणेकामी ई-निविदा |
| निविदा सुचना दिनांक | |
| विभाग | आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, नाशिक. |
| कार्यालयाचा पत्ता | आदिवासी विकास भवन, पहिला मजला, जुना आग्रा रोड, राम गणेश गडकरी चौक, नाशिक-४२२ ००२ |
| कार्यालय प्रमुख | लीना बनसोड भा.प्र.से. |
| पदनाम | सदस्य सचिव, महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटी, नाशिक तथा आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक |
| निविदा फार्मची किंमत रुपये | रुपये ५०,०००/- (अक्षरी रुपये- पन्नास हजार रुपये फक्त) |

**२. निविदा सुचना: -**

सदस्य सचिव, महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटी नाशिक तथा आयुक्त आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य नाशिक हे यांच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या ३७ एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुलमधील इयत्ता ६ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांना CBSE/ NCERT च्या क्रमिक पुस्तकांव्यतिरिक्त, व्यवसाय वर्कबुक, संदर्भ पुस्तके, JEE / NEET, गाईडस व इतर आवश्यक पुस्तके पुरवठा पुरविण्याकरिता नामांकित व मुळ पुस्तक प्रकाशक यांचेकडून पुस्तकांची बांधणी, छपाई, शाई गुणवत्ता, कागद गुणवत्ता या आधारे पुस्तकांच्या मुळ किंमतीवर (एमआरपी) जास्त सुट देईल अशा प्रकाशकांकडून खरेदीसाठी निविदा मागवीत आहेत.

निविदेची अंदाजित रक्कम व बयाना रक्कम खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वस्तुंचे नांव | अंदाजित रक्कम एकूण रुपये | बयाणा रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | ३७ एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुलमधील इयत्ता ६ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांना CBSE/ NCERT च्या क्रमिक पुस्तकांव्यतिरिक्त, व्यवसाय वर्कबुक, संदर्भ पुस्तके, JEE / NEET, गाईडस व इतर आवश्यक पुस्तके | ९,००,००,०००/- | ९,००,०००/- |

**३. ऑनलाईन निविदा चा कार्यक्रम: -**

ऑनलाईन निविदा स्विकृती खालील निविदा वेळापत्रकानुसार असेल

**निविदा वेळापत्रक**

| अ.क्र. | अपर आयुक्त स्तरावरील कार्यवाही | निविदाकारांच्या स्तरावरील कार्यवाही | कार्यवाहीची सुरुवात होण्याचा दिनांक व वेळ | कार्यवाही समाप्त होण्याचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|
| १. | निविदा प्रकाशित करणे | - | दि. २८/४/२०२६ रोजी | दि.२८/०५/२०२६ सांय. ५.०० वाजेपर्यंत |
| २. | - | निविदा डाऊनलोड करणे व निविदा तयार | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे |
| ३. | | निविदा सादर करणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे |
| ४. | प्री बीड मीटींग | - | दि. ०५/०५/२०२६ आयुक्तालय, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक, पहिला मजला, गडकरी चौक, नाशिक-४२२००२ | दुपारी १२.३० वाजता |
| ५. | तांत्रीक लिफाफा उघडणे | - | GEM नुसार | |
| | | | सदस्य सचिव महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटी, नाशिक तथा आयुक्त,आदिवासी | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | विकास आयुक्तालय महाराष्ट्र राज्य नाशिक |
| ६. | व्यापारी लिफाफा उघडणे | - | व्यापारी लिफाफा उघडणेबाबतचा दिनांक निविदा पोर्टलवर कळविण्यात येईल. |

सूचना

१. निविदा ऑनलाईन भरण्यात यावी.
२. **निविदाकार हा मुळ प्रकाशक असणे आवश्यक.**
३. अपूर्ण व सशर्त तसेच अटीची पूर्तता न केलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.
४. ऑनलाईन अपलोड केलेली निविदा कागदपत्रे साक्षांकित असणे आवश्यक आहे.
५. निविदा वेळापत्रकानुसार उघडणे काही कारणास्तव शक्य न झाल्यास खरेदी समिती निश्चित करेल त्या दिनांकास निविदा उघडण्यात येतील, या निविदा बाबत यापुढे दिलेल्या अटी शर्ती व्यतिरिक्त काही अतिरिक्त अटी व शर्ती यांचा पुरवठा आदेशात व करारनाम्यात समावेश करण्याचा अधिकार समितीने राखून ठेवलेला आहे. तसेच निविदेतील खरेदीची रक्कम ही अंदाजित असून प्रत्यक्षात वस्तुंच्या परिमाणानुसार बदलु शकते.

**४. महत्वाच्या सुचना: -**

| | |
|---|---|
| १. | निविदा फॉर्म मधील सर्व पृष्ठे व सोबतचे परिशिष्ट सही शिक्यानिशी परिपूर्ण भरुन अनुक्रमांक निहाय ऑनलाईन निविदा पोर्टलवर सादर करणे बंधनकारक राहील. |
| २. | निविदा फॉर्म शुल्क व बयाणा रक्कम (EMD) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग दिनांक ०१.१२.२०१६ मधील तरतुदीनुसार सुट राहील. |
| ३. | सर्व इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रीयेत भाग घेण्यासाठी https://mahatenders.gov.in या निविदा Portal वर Enroll करणे आवश्यक आहे. |
| ४. | निविदाकारांना वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन Enrollment करणे संदर्भात काही शंका / अडचणी व निविदा सादर करणे संदर्भात तांत्रिक अडचणी उदभवत असल्यास त्यांनी Maha Tender Portal वरील टोल फ्री कंमाकावर संपर्क करावा. |
| ५. | निविदेत सहभाग घेवु इच्छित सर्व निविदाकारांना सूचित करण्यात येते की, सदर निविदेची कार्यवाही ऑनलाईन पध्दतीने पार पाडण्यात येईल. काही तांत्रीक अडचणी उदभवल्यास https://mahatenders.gov.in या वेबसाईटवरील मदत केंद्रावर संपर्क करावा. इंटरनेट, विद्युतपुरवठा किंवा संगणक बिघाड इत्यादी कारणांमुळे निविदा सादर करण्यास विलंब झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. तसेच वरील वेळापत्रकानुसार त्या त्या स्तरावर कार्यवाही यशस्वीरित्या पुर्ण करावयाची जबाबदारी ही निविदाकारांची राहील. ईमेल, फॅक्स, हस्तेपोच इत्यादी द्वारे सादर केलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. |

| | |
|---|---|
| ६. | सदर निविदा मंजूर करणे, त्यामधील अटी व शर्ती मध्ये वाढ करणे किंवा अटी व शर्ती शिथील करणे, निविदा उघडण्याचा दिनांक पुढे ढकलणे तसेच निविदा प्रक्रीयेत बदल करणे अथवा संपुर्ण निविदा प्रक्रीया रद्द करणे, एकापेक्षा जास्त पुरवठादारांची नेमणूक करणे तसेच पुरवठा आदेश रद्द करणे इ. व इतर अनुषंगीक बाबतचे संपुर्ण हक्क व अधिकार सदस्य सचिव, महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल तथा आयुक्त, आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी राखून ठेवले आहेत. |
| ७. | निविदेतील नमुद वेळापत्रकानुसार आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक येथे Pre-Bid Meeting घेण्यात येईल. त्यानुषंगाने सदस्य सचिव, महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल तथा आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचा निर्णय अंतिम राहील व सर्व निविदाकारांवर बंधनकारक राहील. |
| ८. | सदर निविदा ही दोन लिफाफा पध्दतीने असून लिफाफा क्रमांक १ मध्ये तांत्रिक कागदपत्रे सादर करावीत व व्यापारी लिफाफा क्रमांक २ मध्ये दर नमुद करावेत. लिफाफा क्रमांक १ मध्ये दराचा लिफाफा सादर केल्यास सदरची निविदा रद्द समजण्यात येईल. |
| ९. | तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरलेल्या निविदा धारकांना सदस्य सचिव / आयुक्त कार्यालयात त्यांनी निविदेच्या BOQ मध्ये ज्या पुस्तकांकरिता निविदा भरलेली आहे त्या पुस्तकाची एक प्रत जमा करावी लागेल.ज्यावर पुस्तकाची छापील किंमत नमुद असावी. |
| १०. | सदस्य सचिव / आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीमध्ये निविदा धाराकांनी नमुना म्हणुन सादर केलेल्या पुस्तकांचे परीक्षण करण्याकरीता आवश्यकतेप्रमाणे विषय शिक्षक यांना विशेष निमंत्रित केले जाईल. सदर समिती या पुस्तकांचे खालील निर्देशकानुसार (इंडिकेटर) निरीक्षण / परीक्षण करुन पुस्तकांची शिफारस करेल.<br><br>१. पाठ्यपुस्तकावर आधारीत पुस्तकात समाविष्ट केलेला मसुदा किंवा आशय<br>२. पाठ्यपुस्तकावर आधारीत पुस्तकावर समाविष्ट केलेल्या मसुदाची / आशयाची मांडणी .<br>३. पुस्तकाची बांधणी, रचना, रंगसंगती व दर्जा<br>४. पुस्तकाच्या कागदाचा दर्जा<br>५. पुस्तकातील आकलनक्षम सोप्या भाषेतील आशय<br>६. पुस्तकातील प्रश्नावलीची संख्या व प्रश्नांचे स्वरुप |
| ११. | तांत्रिक दृष्ट्या पात्र निविदा धाराकांचेच व्यापारी लिफाफे उघडण्यात येतील. |
| १२. | पुस्तकांवर जास्तीत जास्त सुट किंवा कमी किंमत हाच केवळ निविदाधारक निश्चित करण्याचा अंतिम निकष नसेल.शिक्षकांच्या समितीने दिलेल्या गुणांकानानुसार किमान गुण खरेदी समिती मार्फत ठरवले जातील व किमान गुण मिळालेल्या पुस्तकातून L-१ निविदाकार निवडण्यात येतील. |

| | |
|---|---|
| १३. | व्यापारी लिफाफा बाबत निविदेसोबत EXCEL फॉरमॅट मध्ये BOQ नमुना देण्यात आलेला असुन सदरील नमुन्यात निविदाधारक यांनी गटनिहाय त्यातील ज्या पुस्तकाचे ते प्रकाशक असतील त्यांचे दर भरुन तो व्यापारी लिफाफात (FINANCIAL BID) ( Excel व PDF स्वरुपात) अपलोड करण्यात यावे. सदरचे दर जर तांत्रिक लिफाफ्यात किंवा इतरत्र सादर केले तर अशा निविदाधारकास अपात्र घोषीत करण्यात येईल. |

**निविदा भरण्याबाबत सुचना व अटी :-**

१. प्रकाशीत केलेल्या पुस्तकांचा व त्यांचेच दर भरणे आवश्यक आहे.

२. BOQ मध्ये नमुद पुस्तकांपैकी ज्या पुस्तकांचे प्रकाशक हे निविदाधारक असतील त्यांचेच दर भरणे क्रमप्राप्त राहील

३. निविदाकार यांनी उलाढाल, अनुभव इत्यादी बाबत निविदेतील अटी शर्ती अन्वये तांत्रिक पात्रता निश्चित केली जाईल.

४. ज्या निविदाधारकाचे पुस्तकनिहाय दर कमी असतील तो निविदाधारक त्या पुस्तकाला न्युनतम दर धारक म्हणून घोषीत करण्यात येईल.

## १. पाकीट क्रमांक- १ (तांत्रीक लिफाफा)

(पुर्व पात्रता निकष) (Pre-Qualification Criteria)

-: तांत्रीक लिफाफा मधील आवश्यक कागदपत्रे खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | निकष | तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करावयाचे आवश्यक कागदपत्रे. |
|---|---|---|
| १. | निविदाकार हे कंपनी कायदा १९५६/ दुकान कायदा १९४८ अंतर्गत भारतात नोंदणीकृत मालक किंवा कंपनी / फर्म असावा आणि त्याचे महाराष्ट्रात वैध नोंदणीकृत कार्यालय असावे आणि वैध फर्म नोंदणी असावी. | १. फर्म नोंदणी प्रमाणपत्र / दुकान कायदा/ CIN/ भागीदारी करार इ.<br>२. पॅन कार्ड प्रत.<br>३. GST नोंदणी प्रमाणपत्र.<br>४. निविदाकार जर उत्पादक असेल तर वैध नोंदणी / परवाना प्रमाणपत्र.<br>५. MSME श्रेणी अंतर्गत उदयम नोंदणी प्रमाणपत्र.<br>६. EMD रक्कम भरण्यापासून सुट असल्यास तसे सक्षम प्राधिकाऱ्यांचे प्रमाणत्र. |
| २. | निविदाकार यांना कोणत्याही राज्य सरकार/ केंद्र सरकार/ निमसरकारी/ सार्वजनिक उपक्रमांनी काळया यादीत समाविष्ट केलेले नसावे. | १. निविदाकार यांच्या अधिकृत स्वाक्षरीकर्त्याने रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर घोषणा पत्र सादर करावे. सदर घोषणा पत्रामध्ये त्यांची संस्था कोणत्याही राज्य, सरकार/ केंद्र सरकार किंवा सार्वजनिक उपक्रमांनी काळया यादीत टाकलेले नाही. तसेच निविदा सादर करण्याच्या दिनांकापर्यत संस्थेस भ्रष्ट किंवा फसव्या पध्दतीसाठी अपात्रतेच्या घोषणेअंतर्गत नमुना क्र. २ मध्ये निर्दिष्ट केलेल्या नमुन्यात निविदाकार यांनी त्यांच्या संस्थेच्या लेटरहेडवर स्वाक्षरी व शिक्का करुन सादर करावे. |
| ३. | सुक्ष्म व लघु व तत्सम उद्योजक करीता | १. निविदाधारक हा लघुउद्योजक असल्यास सुक्ष्म व लघु व तत्सम उद्योग मंत्रालय भारत सरकार यांचे प्रमाणित केलेले अद्ययावत उद्दम आधार प्रमाणपत्र जोडावे तसेच निविदा धारक स्वत: उत्पादक असेल तर सक्षम प्राधिकाऱ्याचे वैध असलेले छपाई कामासाठीच्या छापखान्याचे (factory licence) निविदा धारकाचे छपाई कामासाठी छापखान्याशी टाय-अप असल्यास त्या छापखान्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे वैध असलेले (factory licence) किंवा शासकीय मुद्रणालय यांचे ज्याच्याशी टाय-अप आहे त्यांचा छापखाना सुस्थितीत असल्याचे व क्षमता निर्देशित करणारे २०२५-२६ मधील वैध प्रमाणपत्र जोडावे. |
| ४. | उलाढाल आणि आर्थिक विवरण. | १. निविदाकाराची २०२२-२३, २०२३-२४ २०२४-२५ या ३ वर्षाची सरासरी निविदा रकमेच्या (३०%) रुपये २,७०,००,०००/-( दोन कोटी सत्तर लाख) उलाढाल असावी. उलाढाल बाबत सनदी लेखापाल (C.A.) यांनी दिलेले UDIN क्रमांकासह उलाढाल प्रमाणपत्र सादर करावे. |

| | | |
|---|---|---|
| | | २. निविदाकार यांनी मागील ३ वर्षाचे (सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५) लेखापरीक्षणकृत ताळमेळपत्र Audited Balance Sheet तसेच लेखापरीक्षणकृत नफा तोटा विवरणपत्र Audited Profit & Loss Statement सादर करावे. |
| ५. | वस्तु, सेवा कर व आयकर | १. ३१ मार्च, २०२५ अखेर GST भरणा केल्याचे सनदी लेखापाल (C.A.) यांचे UDIN क्रमांकासह प्रमाणपत्र सादर करावे.<br>२. निविदाकार यांनी २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र सादर करावे. |
| ६. | अनुभव प्रमाणपत्र | १. निविदाकारास CBSE/ NCERT च्या क्रमिक पुस्तकां व्यतिरिक्त, व्यवसाय वर्कबुक, संदर्भ पुस्तके, JEE / NEET, गाईडस व इतर आवश्यक पुस्तके प्रकाशन करण्याचा किमान ३ वर्षाचे अनुभव असल्याचे सनदी लेखापाल यांचे UDIN क्रमांकासह अनुभव प्रमाणपत्र सादर करावे.<br>२. शाळांना पुरवठा केल्याचे आदेश व काम पुर्णत्वाचा दाखला जोडणे आवश्यक राहील.<br>३. निविदाधारकाकडे मागील ३ वर्षात म्हणजेच २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ निविदेतील मागणी केलेल्या CBSE/NCERT अभ्यासक्रमावर आधारीत पुस्तकांची एकुण विक्री संख्या किमान ६ लाख असणे आवश्यक राहील. तसेच सनदी लेखापालांचे UDIN क्रमांकासह प्रमाणित केलेल प्रमाणपत्र जोडावे. |
| ७. | निव्वळ संपत्ती प्रमाणपत्र<br><br>(Net Worth) | १. ३१ मार्च, २०२५ अखेर Positive Net worth Certificate with UDIN क्रमांकासह सादर करावे. |
| ८. | कंपनी प्रोफाईल/ फर्म प्रोफाईल ज्यामध्ये प्रमाणित सुवाच्च प्रतीचा समावेश आहे. | १. निविदाकार संस्था जर नोंदणीकृत संस्था असेल तर निगमन प्रमाणपत्राची प्रत सादर करावी.<br>२. सुक्ष्म व लघुउद्योगांचे नोंदणीकृत असेल तर नोंदणी प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत सादर करावी. |
| ९. | संस्थेचे कंपनी नोंदणी प्रमाणपत्र व पत्याचा पुरावा. | **निविदा धारकाची** पुस्तके ही विद्यार्थ्यांसाठी बाजारात उपलब्ध असावीत करिता आपली पुस्तके बाजारात कुठे उपलब्ध आहेत याबाबत माहिती सादर करावी. महाराष्ट्रातील किमान १० जिल्ह्यामध्ये वितरकाकडे आपली उपरोक्त पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध असावी व अशी वितराकांची माहिती खालील नमुन्यात सादर करावी. |

वितरकांची यादी सादर करावयाचा नमुना

| अ.क्र. | निविदाकाराच्या वितराकाचे नाव | पत्ता, संपर्क क्रमांक व GST No | विद्यार्थ्यांना CBSE/ NCERT च्या क्रमिक पुस्तकां व्यतिरिक्त, व्यवसाय वर्कबुक, संदर्भ पुस्तके, JEE / NEET, गाईडस व इतर आवश्यक पुस्तके पुरविण्याकरिता |
| --- | --- | --- | --- |
| १ | | | |
| २ | | | |

वरील तक्त्यातील माहिती सनदी लेखापाल यांच्याकडून UDIN नंबर सह प्रमाणीत करुन सादर करावी.

**६. पाकीट क्रमांक २ (व्यापारी लिफाफा)**

व्यापारी लिफाफा बाबत निविदेसोबत EXCEL फॉरमॅट मध्ये BOQ नमुना देण्यात येत असुन सदरील नमुन्यात निविदाधारक यांनी ज्या पुस्तकाचे ते प्रकाशक असतील त्यांचे दर भरुन तो व्यापारी लिफाफात (FINANCIAL BID) ( Excel व PDF स्वरुपात) अपलोड करण्यात यावे. सदरचे दर जर तांत्रिक लिफाफ्यात किंवा इतरत्र सादर केले तर अशा निविदाधारकास अपात्र घोषीत करण्यात येईल. दर भरताना निविदाकर प्रकाशित करत असलेल्या पुस्तकांचेच दर भरावेत.

### ७. सर्वसाधारण अटी व शर्ती

१) निविदाधारकाने इयत्ता निहाय गठ्ठे पुरवठा करणे बंधनकारक राहील तसेच संबंधीत आश्रमशाळेच्या इयत्ता निहाय विद्यार्थी संख्येनुसार निविदाधारकाने गठ्ठा पुरवठा करावा लागेल. इतर बाबत पुरवठा आदेशाबरोबर संख्या दिली जाईल.

२) माल पुरवठयासंबंधी स्विकृत निविदाधारकास महाराष्ट्र स्टॅम्प ॲक्ट १९५८ (सुधारित) मधील तरतुदीनुसार पुरवठा आदेशातील रकमेनुसार विहीत स्टॅम्पसह करारनामा करुन दयावा लागेल. त्याचा पूर्ण खर्च पुरवठादाराने करावयाचा आहे.

३) निविदा स्विकृत झाल्यानंतर पुरवठा आदेशाच्या रकमेच्या ३% सुरक्षा ठेव म्हणून सदस्य सचिव महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटी, नाशिक यांचे नावे धनाकर्ष (राष्ट्रीयकृत बँकेचा किंवा शेड्यूल बँकेची) अथवा बँक गॅरंटी (राष्ट्रीयकृत बँकेची किंवा शेड्यूल बँकेची) निविदा स्विकृतीच्या दिनांकापासून सात दिवसाच्या आत या कार्यालयात जमा करावे लागेल. सुरक्षा ठेव रक्कम पुरवठ्याची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर परत केली जाईल. यासाठी मागणी अर्ज आवश्यक असेल. तसेच त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

४) ज्या निविदाधारकांची निविदा नामंजूर करण्यात येईल त्यांची बयाणा रक्कम परत करण्यात येईल. मात्र ज्याची निविदा मंजूर केली जाईल त्यांना दिलेल्या मुदतीत सुरक्षा ठेव जमा करावे लागेल. तसे न केल्यास किंवा असमर्थता दर्शविल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. सूक्ष्म व लघु उद्योजकांना उलाढाल व अनुभव मधून सूट देण्यात येईल (शासन खरेदी धोरणातील तरतुदीनुसार). तसेच दिनांक ०१.१२.२०१६ च्या तरतुदी नुसार स्टार्ट अप बाबतच्या तरतुदी या लागू राहतील.

५) निविदेत नमूद केलेले दर हे सर्व खर्चासहीत व करासह एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल स्तरावर पोहोच करावी लागतील. त्यात पात्र निविदाधारकाला पुरवठा करावयाची एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल व इयत्ता निहाय विद्यार्थी संख्या पुरवठा आदेशा सोबत देण्यात येईल.

६) **करारनामा केल्याच्या दिनांकापासून** ३० दिवसाच्या आत पुरवठा सुरु करावा लागेल. तसेच सबंधित पुरवठादारास आदेश प्राप्त झाल्यानंतर ६० दिवसात मालाचा पुरवठा पूर्ण करावा लागेल. मुदतीत पुरवठा सुरु न केल्यास किंवा पुरवठयाची असमर्थता दर्शविल्यास पुरवठ्याचा करार रद्द करण्यात येईल व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व कार्यालयाचे होणारे नुकसानीसाठी कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

७) निविदाधारकाने निविदा अर्ज विहीत नमुन्यात व पूर्ण भरावा. अपूर्ण व चुकीचा अर्ज विचारात घेण्यात येणार नाही.

८) बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज देता येणार नाही.

९) निविदाधारकांने सादर केलेली कागदपत्रे बनावट / चुकीची आढळल्यास अशा निविदाधारकाची निविदा विचारात घेतली जाणार नाही व त्याच्या विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. अशा निविदा धारकास

भविष्यात आदिवासी विकास विभागाच्या कार्यालयाकडून मागविल्या जाणा-या कोणत्याही निविदेत भाग घेता येणार नाही.

१०) ऑनलाईन अपलोड केलेली निविदा कागदपत्रे साक्षांकित असणे आवश्यक आहे.

११) निविदेशी निगडीत कोणतेही अभिलेखे निविदाकाराने मागणीनुसार सादर करणे आवश्यक राहील.

१२) सर्व निविदाधारकांना ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या कागदपत्राची मागणीनुसार एक स्वच्छ व स्पष्ट प्रत आयुक्त कार्यालयास सादर करावी लागेल.

१३) ज्या पुरवठादाराचे दर मंजूर होतील त्यांना वर नमूद केल्यानुसार शाळा स्तरावर पुरवठा आदेशातील संख्येनुसार इयत्ता निहाय गट करुन साहित्याची वाहतूक स्वखर्चाने करुन पोहोच करावी लागेल.

१४) निविदेमध्ये पुरवठा करावयाच्या पुस्तकांची नगसंख्या अंदाजित आहे. त्यामध्ये कमी/जास्त होण्याची शक्यता आहे. जर साहित्य कमी किंवा जास्त आवश्यकता वाटल्यास निविदेतील दराप्रमाणे पुरवठा करण्यास पुरवठादारास बंधनकारक राहील. या संदर्भातील आदेशामध्ये दुरुस्ती करण्याचे सर्व अधिकार मा. सदस्य सचिव महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटी नाशिक तथा आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांना असतील

१५) पुरवठादाराच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे व मालाची निकड लक्षात घेता किंवा पुरवठा वेळेत न केल्यास जादा दराने या कार्यालयास दुसरीकडून माल खरेदी करावा लागला तर या कार्यालयास झालेले नुकसान पुरवठाधारकाकडून वसूल केले जाईल. त्याबाबत कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार मा. सदस्य सचिव महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटी नाशिक तथा आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांना राहतील व याबाबत मा. सदस्य सचिव महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटी नाशिक तथा आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचा निर्णय अंतिम राहील.

१६) निविदेतील दर स्विकृत केल्याच्या दिनांकापासून १ वर्षाकरीता वैध राहतील. या कालावधीत याच मंजूर दराने पुरवठा करण्याचे बंधन निविदाधारकांवर राहील.

१७) CBSE/ NCERT च्या क्रमिक पुस्तकां व्यतिरिक्त, व्यवसाय वर्कबुक, संदर्भ पुस्तके, JEE / NEET, गाईडस व इतर आवश्यक पुस्तके या करीता पुस्तकांमध्ये वापरण्यात येणारा कागद हा किमान ५८ GSM असावा. तसेच छपाई करीता वापरण्यात येणारी शाई ही विद्यार्थ्याकरीता अपायकारक नसावी.

१८) सर्व पुस्तके ही ऑफसेट प्रिंटीग/वेब प्रिंटीग द्वारे प्रिंट केलेली असावीत. निविदाधारकास प्रिंटीग सुस्पष्ट व सुव्यवस्थितीत करणे तसेच पुस्तकांचा दर्जा खालवणार नाही याची काळजी घेणे बंधनकारक राहील.

१९) पुरवठा करावयाच्या व्यवसाय वर्क बुकमध्ये विद्यार्थ्यांच्या दृष्टीने सोप्या भाषेचा वापर असणे आवश्यक राहील. सरावासाठी अतिरीक्त प्रश्नावली व वर्कशिट असाव्यात. तसेच त्यात Label Diagram असणे देखील आवश्यक राहील.

२०) मंजूर केलेल्या अधिकृत नमुन्याप्रमाणे व ठरवून दिलेल्या मुदतीत साहित्याचा पुरवठा झाल्यावर पुरवठा केलेल्या साहित्याची देयके मा. सदस्य सचिव महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटी नाशिक यांचे नावे या कार्यालयास सादर करावे. या कार्यालयाने विहीत केलेल्या पोहोच पावत्या योग्य त्या प्रमाणपत्रासह देयकांसोबत सादर कराव्या लागतील. त्याशिवाय देयक अदायगीबाबत कार्यवाही केली जाणार नाही.

२१) **एकूण मालाच्या मागणीनुसार पुरवठा आदेशातील विनिर्देशानुसार माल पुरवठा झाल्यानंतर एकलव्य मॉडेल रेसिडेन्शिअल स्कुलच्या प्राचार्य यांच्या पोहोच पावती, रॅन्डम नमुने तपासणी अहवाला व माल सुस्थतीत प्राप्त झाल्याचे प्राचार्य यांचे प्रमाणपत्र 30 दिवसाच्या आत देणे गरजेचे आहे. त्यान्वये निधी उपलब्धतेनुसार 100% रक्कम अदा करण्यात येईल.**

**संबंधित प्राचार्यांनी मालाचा पुरवठा पूर्ण झाल्यापासून 30 दिवसांच्या आत वाटप पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आयुक्तालयास सादर करणे बंधनकारक राहील. सदरील नमुद मुदतीत पुरवठा पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास पुरवठा सुस्थितीत पुर्ण झाल्याचे व त्याबाबत कुठलीही तक्रार नसल्याचे गृहीत धरुन देयक अदायगी करण्यात येईल.**

२२) या कार्यालयात काही अपरिहार्य कारणांमुळे बिलाची रक्कम अदा करण्यास विलंब झाल्यास विलंबाबद्दल व्याज दिले जाणार नाही. अगर पुरवठाधारास कायदेशीररित्या कारवाई करता येणार नाही.

२३) पुरवठा कालावधीमध्ये पुस्तकांचा पुरवठा न झाल्यास उशीरा पुरवठा केलेल्या मालाच्या निविदेतील सुट असलेल्या किमतीवर अर्धा टक्का प्रती आठवडा याप्रमाणे दंड आकारण्यात येईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

अ) पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत १ लाखापेक्षा कमी असेल तर अशा निविदेतील सुट असलेल्या किमतीच्या १०% दंड

ब) पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत १ लाखापेक्षा जास्त असेल तर अशा निविदेतील सुट असलेल्या किंमतीच्या ५% दंड

क) पुरवलेल्या मालाचा दर्जा समाधानकारक नसल्यास जेवढ्या मालाचा दर्जा समाधानकारक नसेल तेवढ्या मालाच्या रकमेच्या ५% दंड आकारण्यात येईल

ड) पुरवठा कालावधीत पुस्तकांच्या किंमतीत वाढ झाल्यास वाढीव दराची मागणी पुरवठादारास करता येणार नाही.

२४) कोणतेही कारण न देता एखादी किंवा संपुर्ण निविदा पुर्णतः अथवा अंशतः मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार मा. सदस्य सचिव महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटी नाशिक यांना राहील. **तो निर्णय निविदाकार यांच्यावर बंधनकारक राहील.**

२५) पुरवठा धारकाने केलेल्या पुरवठ्यासंबंधी अथवा करारासबंधी काही वाद निर्माण झाल्यास सदर वादांबाबत मा. सदस्य सचिव महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटी नाशिक यांनी दिलेला निर्णय अंतिम राहील व तो निविदाधारकांवर बंधनकारक राहील.

२६) न्यायालयीन कार्यक्षेत्र नाशिक राहील.

२७) निविदाधारक हा सरकारी/निमसरकारी/महानगरपालिका/शासनाचे अंगीकृत व्यवसाय व महामंडळे यांनी काळया यादीत समाविष्ट केले नसल्याबाबतचे रु. ५००/- चे मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र जोडावे.

२८) निविदाकारने पुरवठा करावयाच्या पुस्तकांवर “आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, सन २०२६-२७” हे मुख्य पृष्ठावर नमुद करणे आवश्यक राहील.

२९) निविदाधारकांचे कार्यरत कार्यालय महाराष्ट्र राज्यामध्ये असणे आवश्यक आहे.

३०) व्यापारी लिफाफ्यात प्रकाशक आपल्या स्वत:च्या प्रकाशित पुस्तके याची खात्री करावी व गटातील सर्व पुस्तके BOQ मध्ये भरणे आवश्यक राहील. समितीने एका वर्गामध्ये व एका विषयाची एकापेक्षा जास्त पुस्तके शिफारस केल्यास किंमत हा निकष ठेवला जाईल.

सदस्य सचिव
महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटी नाशिक
तथा आयुक्त आदिवासी विकास
महाराष्ट्र राज्य नाशिक

उपरोक्त अटी व शर्ती मी/आम्ही काळजीपुर्वक वाचल्या असुन त्या मला/आम्हाला मान्य असुन बंधनकारक राहतील करीता स्वाक्षरी केली आहे.

ठिकाण :-
दिनांक :-

निविदाधारकाची सही/नाव व सिल

परिशिष्ट -१

(तांत्रीक लिफाफा मधील आवश्यक कागदपत्रातील क्रमांक ९ चे प्राधीकार पत्र-प्रतिनिधीस प्राधीकृत केल्याचे पत्र)

दिनांक:    /   /

प्रति,
मा. आयुक्त,
आदिवासी विकास,
महाराष्ट्र राज्य, नाशिक

विषय :-______________________________

आदरणीय महोदय,

आम्ही____________________________________एक नावाजलेले उत्पादक असून____________________________________वस्तूचे उत्पादन आमच्या ___________________________या ठिकाणी करीत आहोत. या संदर्भात आम्ही________________________ यांना आमच्या कंपन्याचे उत्पादीत वस्तुसाठी निविदा प्रक्रियेत भाग घेणे, दर ठरविणे, कॉन्ट्रॅक्टप्रमाणे अंतिमतः पुरवठा पूर्ण करणे यासाठी सर्वस्वी अधिकार या विशेष निविदा नंबर_________________ दिनांक   /   /   साठी देत आहोत.

आपला विश्वासू

(प्रकाशकाचे नांव)

## परिशिष्ट -२

## निविदाधारकाची माहिती

| | |
|---|---|
| निविदाधारकाचे नाव | |
| निविदाधारकाचा संपूर्ण पत्ता | |
| दुरध्वनी क्रमांक | कार्यालय |
| | कंपनी |
| | मोबाइल क्रमांक |
| | ई-मेल आय.डी. |
| संपर्क अधिकारी | |
| | नाव |
| | पदनाम |
| | पत्ता |
| | दुरध्वनी क्रमांक |
| | मोबाईल क्रमांक |
| | फॅक्स क्रमांक |
| | ई-मेल आय.डी. |
| प्राधिकृत प्रतिनिधी | |
| | नाव |
| | पदनाम |
| | पत्ता |
| | दुरध्वनी क्रमांक |
| | मोबाईल क्रमांक |
| | फॅक्स क्रमांक |
| | ई-मेल आय.डी. |
| GST रजिस्ट्रेशन नंबर | |
| पॅन नंबर | |

निविदाधारकाची सही / नाव सिल

**पाकीट क्रमांक 2**

**(व्यापारी लिफाफा)**

# Item Rate BoQ

**Tender Inviting Authority: एकलव्य मॉडेल रेसिडेंशिअल स्कूल**

**Name of Work: एकलव्य मॉडेल रेसिडेंशिअल स्कूल मधील इयत्ता ६ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणावर आधारित मार्गदर्शक , व्यवसाय व इतर पुस्तके**

**Contract No:  e-tender-2026-2027 /**

| Name of the Bidder/ Bidding Firm / Company : | |
|---|---|

**PRICE SCHEDULE**

**(This BOQ template must not be modified/replaced by the bidder and the same should be uploaded after filling the relevent columns, else the bidder is liable to be rejected for this tender. Bidders are allowed to enter the Bidder Name and Values only)**

| NUMBER # | TEXT # | NUMBER # | TEXT # | NUMBER | NUMBER # | DATE | NUMBER # | TEXT # |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sl. No. / अ. क्र. | Item Description / तपशील | Quantity | UOM | छापील किंमत | BASIC RATE In Figures To be entered by the Bidder Rs. P पुस्तका च्या छापील किमतीव र सूट देऊन सर्व | | TOTAL AMOUNT With Taxes | TOTAL AMOUNT In Words पुस्तका च्या छापील किमतीव र सूट देऊन सर्व करांचा आणि वाहतुकी च्या |

| | | | | | करांचा आणि वाहतुकी च्या खर्चासह प्रति पुस्तक दर रुपयात सादर | | | खर्चासह प्रति पुस्तक दर रुपयात सादर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 4 | 5 | 6 | 13 | # | 53 | 55 |
| **1** | **6th Std** | | | | | | | |
| 1.01 | STD 6th - NCERT Based WorkBook - Mathematics | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 1.02 | STD 6th - NCERT Based WorkBook - English | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 1.03 | STD 6th - NCERT Based WorkBook - Science | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 1.04 | STD 6th - NCERT Based WorkBook - Social Studies | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 1.05 | STD 6th - NCERT Based WorkBook - Hindi | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 1.06 | STD 6th - Digest Mathematics | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 1.07 | STD 6th - Digest Social Studies | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 1.08 | STD 6th - Digest Science | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 1.09 | STD 6th - Digest English | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 1.1 | STD 6th - NCERT based Exemplar - Mathematics | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 1.11 | STD 6th - NCERT based Exemplar - | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Science | | | | | | | Zero Only |
| 1.12 | STD 6th - Digest Hindi Vyakaran | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 1.13 | STD 6th - Hindi Shabda Sampada Dictionery | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 1.14 | STD 6th - MARATHI SULABHBHARTI Digest - | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 1.15 | STD 6th - Foundation Books for JEE/NEET exams (All Subject) | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 1.16 | STD 6th - Computer Book | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 1.17 | STD 6th - Map Book | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 1.18 | STD 6th - Value Education | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 1.19 | STD 6th - Mental Maths Practice Book | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 1.2 | STD 6th - Lab Manual ( Science ) | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 1.21 | STD 6th - Financial Litracy | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| **2** | **7th Std** | | | | | | | |
| 2.01 | STD 7th - NCERT Based WorkBook - Mathematics | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 2.02 | STD 7th - NCERT Based WorkBook - English | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 2.03 | STD 7th - NCERT Based WorkBook - Science | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 2.04 | STD 7th - NCERT Based WorkBook - Social Studies | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 2.05 | STD 7th - NCERT Based WorkBook - Hindi | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2.06 | STD 7th - Digest Mathematics | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 2.07 | STD 7th - Digest Social Science | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 2.08 | STD 7th - Digest Science | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 2.09 | STD 7th - Digest English | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 2.1 | STD 7th - Digest Hindi Vyakaran | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 2.11 | STD 7th - NCERT based Exemplar - Mathematics | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 2.12 | STD 7th - NCERT based Exemplar - Science | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 2.13 | STD 7th - Digest MARATHI SULABHBHARTI - | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 2.14 | STD 7th - Foundation Books for JEE / NEET exams (All Subject) | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 2.15 | STD 7th - Computer Book | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 2.16 | STD 7th - Map Book | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 2.17 | STD 7th - Value Education | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 2.18 | STD 7th - Mental Maths | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 2.19 | STD 7th - Lab Manual ( Science ) | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 2.2 | STD 7th - Financial Litracy | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| **3** | **8th Std** | | | | | | | |
| 3.01 | STD 8 th - NCERT Based WorkBook - Mathematics | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3.02 | STD 8 th - NCERT Based WorkBook - English | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 3.03 | STD 8 th - NCERT Based WorkBook - Science | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 3.04 | STD 8 th - NCERT Based WorkBook - Social Studies | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 3.05 | STD 8 th - NCERT Based WorkBook - Hindi | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 3.06 | STD 8 th - Digest Mathematics | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 3.07 | STD 8 th - Digest Social Science - | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 3.08 | STD 8 th - Digest English | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 3.09 | STD 8 th - Digest Science | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 3.1 | STD 8 th - NCERT BASED Exemplar - Mathematics | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 3.11 | STD 8 th - NCERT BASED Exemplar - Science | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 3.12 | STD 8 th - Digest Hindi Vyakaran | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 3.13 | STD 8 th - MARATHI SULABHBHARATI Digest | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 3.14 | STD 8 th - Foundation Books for JEE/ NEET exams (All Subject) | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 3.15 | STD 8 th - Computer Books | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 3.16 | STD 8 th - Map Book | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 3.17 | STD 8 th - Value Education | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 3.18 | STD 8 th - Mental Maths | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | Only |
| 3.19 | STD 8 th - Lab Manual ( Science) | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 3.2 | STD 8 th - Financial Litracy | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| **4** | **9th Std** | | | | | | | |
| 4.01 | STD 9 th - NCERT Based Work Book- English | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 4.02 | STD 9 th - NCERT Based Work Book- Maths | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 4.03 | STD 9 th - NCERT Based Work Book- Science | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 4.04 | STD 9 th - NCERT Based Work Book- Social Science | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 4.05 | STD 9 th - NCERT Based Work Book- Hindi | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 4.06 | STD 9 th - SMART W.B.MAR.AKSHARBHARTI | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 4.07 | STD 9 th - Digest English Langauage | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 4.08 | STD 9 th - Digest Mathematics | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 4.09 | STD 9 th - Digest Science | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 4.1 | STD 9 th - Digest Social Science | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 4.11 | STD 9 th - Digest Hindi | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 4.12 | STD 9 th - NCERT Exemplar - Mathematics | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 4.13 | STD 9 th - NCERT Exemplar - Science | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4.14 | STD 9 th - MAR.(LL) UPYO.LEKH.(NIBANDH) | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 4.15 | STD 9 th - MARATHI AKSHARBHARTI Digest | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 4.16 | STD 9 th - Marathi Vyakaran | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 4.17 | STD 9 th - Foundation Books for JEE / NEET exams (All Subject) | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 4.18 | STD 9 th - Computer Books | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 4.19 | STD 9 th - Map Book | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 4.2 | STD 9 th - Lab Manual ( Science ) | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| **5** | **10th Std** | | | | | | | |
| 5.01 | STD 10 th - NCERT Based Workbook -English | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 5.02 | STD 10 th - NCERT Based Workbook -Maths | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 5.03 | STD 10 th - NCERT Based Workbook -Science | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 5.04 | STD 10 th - NCERT Based Workbook -Social Science | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 5.05 | STD 10 th - SMART W.B.MAR.AKSHARBHARTI | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 5.06 | STD 10 th - Digest English | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 5.07 | STD 10 th - Digest Mathematics | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 5.08 | STD 10 th - Digest Science | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 5.09 | STD 10 th - Digest Social Science | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | Only |
| 5.1 | STD 10 th - NCERT Based Exemplar - Maths | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 5.11 | STD 10 th - NCERT Based Exemplar - Science | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 5.12 | STD 10 th - MAR.(LL) UPYO.LEKH.(NIBANDH) | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 5.13 | STD 10 th - Digest MARATHI AKSHARBHARTI | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 5.14 | STD 10 th - Foundation Books for compititve exams (All Subject) | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 5.15 | STD 10 th - Computer Books | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 5.16 | STD 10 th - Map Book | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 5.17 | STD 10 th - Lab Manual | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 5.18 | STD 10 th - Board Pattern Model Question Bank All Subjects Kit | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| **6** | **11th Std** | | | | | | | |
| 6.01 | STD 11 th - NCERT Exemplar - Physics | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 6.02 | STD 11 th - NCERT Exemplar - Chemistry | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 6.03 | STD 11 th - NCERT Exemplar - Mathematics | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 6.04 | STD 11 th - NCERT Exemplar - Biology | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 6.05 | STD 11 th - NCERT Workbook Biology | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 6.06 | STD 11 th - NCERT Workbook Physics | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6.07 | STD 11 th - NCERT Workbook Chemistry | 1.000 | Nos | | | | | **0.00** | INR Zero Only |
| 6.08 | STD 11 th - NCERT Workbook Maths Class | 1.000 | Nos | | | | | **0.00** | INR Zero Only |
| 6.09 | STD 11 th - Digest Physics | 1.000 | Nos | | | | | **0.00** | INR Zero Only |
| 6.1 | STD 11 th - Digest Chemistry | 1.000 | Nos | | | | | **0.00** | INR Zero Only |
| 6.11 | STD 11 th - Digest Mathematics | 1.000 | Nos | | | | | **0.00** | INR Zero Only |
| 6.12 | STD 11 th - Digest Biology | 1.000 | Nos | | | | | **0.00** | INR Zero Only |
| 6.13 | STD 11 th - Digest English Language | 1.000 | Nos | | | | | **0.00** | INR Zero Only |
| 6.14 | STD 11 th - Digest Marathi | 1.000 | Nos | | | | | **0.00** | INR Zero Only |
| 6.15 | STD 11 th - Marathi Vyakaran | 1.000 | Nos | | | | | **0.00** | INR Zero Only |
| 6.16 | STD 11 th - Digest Accounts | 1.000 | Nos | | | | | **0.00** | INR Zero Only |
| 6.17 | STD 11 th - Book on JEE / NEET - PHYSICS | 1.000 | Nos | | | | | **0.00** | INR Zero Only |
| 6.18 | STD 11 th - Book on JEE / NEET - CHEMISTRY | 1.000 | Nos | | | | | **0.00** | INR Zero Only |
| 6.19 | STD 11 th - Book on JEE / NEET - MATHS | 1.000 | Nos | | | | | **0.00** | INR Zero Only |
| 6.2 | STD 11 th - Book on JEE / NEET - BIOLOGY | 1.000 | Nos | | | | | **0.00** | INR Zero Only |
| **7** | **12 th Std** | | | | | | | | |
| 7.01 | STD 12 th - NCERT Exemplar - Physics | 1.000 | Nos | | | | | **0.00** | INR Zero Only |
| 7.02 | STD 12 th - NCERT Exemplar - Chemistry | 1.000 | Nos | | | | | **0.00** | INR Zero |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | Only |
| 7.03 | STD 12 th - NCERT Exemplar - Mathematics | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 7.04 | STD 12 th - NCERT Exemplar - Biology | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 7.05 | STD 12 th - NCERT Workbook Biology | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 7.06 | STD 12 th - NCERT Workbook Physics | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 7.07 | STD 12 th - NCERT Workbook Chemistry | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 7.08 | STD 12 th - NCERT Workbook Maths | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 7.09 | STD 12 th - Digest Physics | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 7.1 | STD 12 th - Digest Chemistry | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 7.11 | STD 12 th - Digest Mathematics | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 7.12 | STD 12 th - Digest BIOLOGY | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 7.13 | STD 12 th - Digest English | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 7.14 | STD 12 th - Marathi Digest | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 7.15 | STD 12 th - Digest Accounts | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 7.16 | STD 12 th - Board Pattern Model Question Bank ( Science Side - All Subject ) | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 7.17 | STD 12 th - Book on JEE / NEET - PHYSICS | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 7.18 | STD 12 th - Book on JEE / NEET - CHEMISTRY | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7.19 | STD 12 th - Book on JEE / NEET - MATHS | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| 7.2 | STD 12 th - Book on JEE / NEET - BIOLOGY | 1.000 | Nos | | | | **0.00** | INR Zero Only |
| **Total in Figures** | | | | | | | **0.00** | INR Zero Only |
| **Quoted Rate in Words** | | **INR Zero Only** | | | | | | |

## परिशिष्ट : 3

## शाळांची यादी

| Sr. No. | ATC | PO | EMRS Name |
|---|---|---|---|
| 1 | Nashik | Nashik | Peth Road |
| 2 | Thane | Dahanu | Kambalgaon |
| 3 | Nashik | Nashik | Pimprisadroddin |
| 4 | Nashik | Nandurbar | Nandurbar |
| 5 | Nashik | Kalwan | Ajmer Saundane |
| 6 | Nashik | Rajur | Maveshi |
| 7 | Nashik | Dhule | Pimpalner, Sakri |
| 8 | Amravati | Dharni | Chikhaldara, Amravati |
| 9 | Nagpur | Nagpur | Khairiparsoda, Nagpur |
| 10 | Nagpur | Deori | Borgaon Bazar, Gondia |
| 11 | Nagpur | Aheri | Aheri, Gadchiroli |
| 12 | Amravati | Kinwat | Sahastrkund, Nanded |
| 13 | Nagpur | Chandrapur | Dewada, Chandrapur |
| 14 | Thane | Shahapur | Shendegaon, Thane |
| 15 | Nashik | Nashik | Titve, Nashik |
| 16 | Nagpur | Aheri | Chamorshi, Gadchiroli |
| 17 | Nashik | Nandurbar | Dhongsangli, Nandurbar |
| 18 | Nashik | Taloda | Dhadgaon, Nandurbar |
| 19 | Nashik | Taloda | Akkalkuva, Nandurbar |

| | | | |
|---|---|---|---|
| 20 | Nashik | Kalwan | Chankapur ,Nashik |
| 21 | Nashik | Kalwan | Shinde digar, Nashik |
| 22 | Thane | Dahanu | Palsunde, Palghar |
| 23 | Amravati | Pandharkawda | Botoni, Amaravati |
| 24 | Nagpur | Aheri | Gewardha, Gadchiroli |
| 25 | Thane | Dahanu | Savane, Palghar |
| 26 | Nagpur | Gadchiroli | Korchi, Gadchiroli |
| 27 | Nagpur | Bhamragad | Etappali, Gadchiroli |
| 28 | Nagpur | Bhamragad | Bhamragad, Gadchiroli |
| 29 | Thane | Jawhar | Mokhada, Palghar |
| 30 | Thane | Dahanu | Dahanu, Palghar |
| 31 | Amravati | Dharni | Dharni, Amravati |
| 32 | Nagpur | Gadchiroli | Dhanora, Gadchiroli |
| 33 | Nashik | Nandurbar | Mohida , Nandurbar |
| 34 | Nashik | Taloda | Kharwad, Nandurbar |
| 35 | Nashik | Nashik | Peth (Devgaon) |
| 36 | Nashik | Nashik | Boripada, (Mundegaon) |
| 37 | Nashik | Dhule | Bhadne, Sakri, Dhule |

Signature Not Verified
Digitally signed by VINITA SUNIL PATIL
Date: 2026.04.28 20:33:29 IST
Location: Maharashtra-MH